# GOVERNMENT POLYTECHNIC, KHAMGAON-444303

JALAMB ROAD, KHAMGAON-444303

**Ph.No.** (07263) 256644, 252278(FAX) **Email ID** gpolykhamgaon@gmail.com


**परिपत्रक**

जा. क्र. शातंनिखा/उच्च वर्ग प्रवेश/२०२१-२२/..1672..

दिनांक २३/०९/२०२१

**वाचा संदर्भ -** संस्थेच्या बेबसाईटवर उपलब्ध असलेले परिपत्रक क्रमांक १५६१, दिनांक ०७/०९/२०२१

संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की व्दितीय व तृतीय वर्षासाठीची सर्व पात्र विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया **बुधवार दिनांक १५ सप्टेंबर २०२१ पासुन ते शनिवार दिनांक २५ सप्टेंबर २०२१** पर्यंत याप्रमाणे सुरु झालेली आहे. संदर्भाप्रमाणे संस्थेच्या वेबसाईटवर PDF फॉर्मेटमध्ये असलेला ॲडमिशन फॉर्मची आपल्या स्तरावर प्रिंटआऊट काढुन ती सुवाच्य अक्षरांत भरुन आणि लागु असलेले सर्व कागदपत्रे जसे की ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या फीची प्रिंटआऊट, गुणपत्रिका, जात प्रमाणपत्र, सवलती किंवा स्कॉलरशिपची कागदपत्रे जोडुन सदर फॉर्म स्वत:जवळ तयार ठेवण्याविषयी सुचना देण्यात आलेली होती आणि ज्यावेळेस संस्था ही ऑफलाईन मोडमध्ये सुरु होईल किंवा फॉर्म सबमिट करण्याची स्वतंत्र सुचना देण्यात येईल त्यावेळेस ॲडमिशन फॉर्म व त्याला जोडलेली सर्व कागदपत्रे यांचा सेट कार्यालयातील विद्यार्थी विभागाच्या सुपुर्द करावा लागेल असे नमुद करण्यात आलेले होते. तसेच फी भरण्याची प्रक्रिया सोबत दिलेल्या FLOW CHART नुसार राबवुन फी ही ऑनलाईन पध्दतीने भरावयाची आहे हे सुध्दा नमुद करण्यात आलेले होते.

संस्था ही सध्या कोविड-१९ च्या शासकीय प्रोटोकॉलमुळे ऑनलाईन मोडवर असल्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याची पात्रता ही नेहमीच्या पध्दतीने प्रत्यक्षरित्या संस्थास्तरावर तपासता येत नाही. परंतु कोविड काळात मागील दिड वर्षात अनेक विद्यार्थ्यांनी आणि विशेषकरुन पुर्न:प्रवेश घेऊ इच्छिणारे किंवा ATKT व्दारे पुढील सत्रात प्रवेशास पात्र झालेल्या विद्यार्थ्यांनी केलेल्या चुकांमुळे संस्थेला नाहक त्रास भोगावा लागला. तरी **पुर्न:प्रवेश घेऊ इच्छिणारे किंवा** ATKT **व्दारे पुढील सत्रात प्रवेशास पात्र झालेल्या विद्यार्थ्यांनी** खाली दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे आपापल्या विभागात रिपोर्ट करावे व आपले पूर्णपणे भरलेले व सर्व प्रकारची कागदपत्रे लावलेले ॲडमिशन फॉर्म्स तपासुन घ्यावेत. विभागांत तपासुन झाल्यावर सदर फॉर्म्स विद्यार्थी विभागांत जमा करावेत. भविष्यात संस्थेव्दारे करण्यात आलेल्या तपासणीमध्ये एखाद्या विद्यार्थ्याचा प्रवेश नियमावली क्रमांक RG-4(C) & RG-4(D) नुसार झालेला नाही असे आढळुन आल्यास त्याचा प्रवेश आपोआप रद्द होईल व त्यास विद्यार्थी स्वत: जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

| Sr No | Name of Department | Scheduled Date | Remarks |
|---|---|---|---|
| 01 | Mechanical 2nd Year | 28/09/2021 Tuesday | Only For Eligible Students For Re-Admission & ATKT Students. Regular Students need not report to Institute. **पात्र झाल्यामुळे पुर्न:प्रवेश घेऊ इच्छिणारे किंवा ATKT व्दारे पुढील सत्रात प्रवेशास पात्र झालेल्या विद्यार्थ्यांनीच फक्त संस्थेत यांवे. नियमित विद्यार्थ्यांनी येण्याची आवश्यकता नाही.** |
| 02 | Electronics 2nd & 3rd Year | | |
| 03 | Mechanical 3rd Year | 29/09/2021 Wednesday | |
| 04 | Computer 2nd & 3rd Year | | |
| 05 | Electrical 2nd & 3rd Year | 30/09/2021 Thursday | |
| 06 | Civil 2nd & 3rd Year | | |

स्वा/-

डॉ.एस.एस.प्रभुणे

प्राचार्य

शासकीय तंत्रनिकेतन, खामगांव

*प्रत - सर्व विभागप्रमुख उप.यंत्र./स्थापत्य/संगणक/विद्युत/अणुविद्युत/यंत्र/विज्ञान/कर्मशाळा/कार्यालय/ग्रंथालय/ सुरक्षा रक्षक प्रभारी यांनी फक्त संबंधित विद्यार्थ्यांनाच संस्थेत प्रवेश द्यावा/श्री आंबटकर, प्रोग्रामर, शातंनि, खामगांव यांना संकेतस्थळावर अपलोड करण्यासाठी.*